क्रमांक : कामगार विभाग /ब/ककनिस/24695
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई नं. ५१.

दिनांक - 19th June, 1992.

परिपत्रक

विषय :- कर्मचारी कल्याण निधी -
मंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांना
रोख पारितोषिके व शिष्यवृत्ती देणे बाबत.

१) कर्मचारी कल्याण निधीतून १९९२ च्या मार्च / एप्रिल मध्ये झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या मंडळातील कर्मचा-यांच्या पाल्यांना विशेष पारितोषिक, रोख पारितोषिक व शिष्यवृत्या देण्याकरिता तसेच दिलेल्या शिष्यवृत्या पुढे चालू ठेवण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व क्षेत्रिय अधिका-यांना हया पत्राव्दारे विनंती करण्यात येते की, त्यांनी या योजनेबद्दल कर्मचा-यामध्ये भरपूर प्रमाणात प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

या परिपत्रका सोबत अर्जाच्या नमुन्याची प्रत जोडली आहे . या अर्जाच्या नमुन्यातच अर्ज पाठवावेत. कर्मचा-यांनी आपले अर्ज त्यांच्या विभागातील त्या त्या परिक्षांचे निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसाचे आत मात्र जास्तीतजास्त दिनांक २०-७-९२ पर्यंत असे अर्ज परस्पर मुख्य कार्यालयास पाठवावेत. वरील मुदतीनंतरचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. अर्जाचे प्रपत्र भरतांना त्या संबंधिच्या सर्व सूचना समजून घेऊन सर्व आवश्यक प्रमाणपत्र जोडण्यास विसरू नये. आवश्यक नसलेले रकाने रेघ मारून खोडावेत.

२) त्याचप्रमाणे उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या १९९२-९३ करिता चालू ठेवावयाच्या असल्यास योग्य ती प्रमाणपत्रे, गुणांची यादी आणि उच्च शिक्षण घेत असल्याचा कागदोपत्री पुरावा इत्यादिच्या आवश्यक प्रतीसह ( प्रमाणित करून ) तसे अर्ज वर दाखविलेल्या मुदतीत त्या त्या परिमंडल कार्यालयास मिळतील अशा रितीने सादर करण्यात यावेत. तसेच शिष्यवृत्या चालू ठेवण्याचे अधिकार त्या त्या परिमंडळाच्या मुख्य अभियंत्यांना देण्यात आलेले असल्याने शिष्यवृत्ती चालू ठेवण्याचे अर्ज मुख्य कार्यालयास पाठवू नयेत . या प्रकारच्या अर्जावर मुख्य कार्यालयातील कर्मचा-यांच्या अर्जा खेरीज इतर अर्जावर कारवाई होणार नसल्याने त्याच्या प्रती मुख्य कार्यालयास पाठवू नयेत.

३) कोणत्याही परिस्थितीत अर्ज उशिरा न पाठविता नियोजित तारखेपर्यंत पाठवावेत.

४) पाल्यास संबंधित परिक्षेत पारितोषिक व शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी कमीत कमी ६० टक्के एकूण गुण मिळविणे आवश्यक आहे.

कृ.मा.पा....२/-

५) तसेच असेही आढळून आले आहे की, चतुर्थ श्रेणी कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी ह्यांना कर्मचारी कल्याण निधीतून अशा त-हेची पारितोषिके / शिष्यवृत्या त्यांच्या पाल्यांना दिल्या जातात या बाबतची पाहिजे तेवढी माहिती नसल्यामुळे त्यांच्याकडून या योजनेला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. वास्तविकपाहता ह्या मुधावर या कार्यालयाचे परिपत्रक क्र. कामगार विभाग / ब/ कल्कनिस/२३२३३ दिनांक १३-७-८९ नुसार योग्य प्रतिसादासाठी सर्व क्षेत्रिय अधिका-यांना याआधिही विनंती करण्यात आली आहे की, जास्तीत जास्त कर्मचा-यांना लाभ घेण्यासाठी ह्या योजनेचा विस्तृत प्रमाणावर प्रचार करावा. तरी सर्व क्षेत्रिय अधिका-यांचे लक्ष पुन्हा एकदा वरील परिपत्रकाकडे वेधण्यात येऊन विनंती की, त्यांनी ह्या कल्याणकारी योजनेचा लाभ अधिकाधिक कर्मचा-यांच्या पाल्यांनाघेणेसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

६) मंडळाच्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत गुणवत्ता यादीत पहिल्या ५० क्रमांकापर्यंत आलेले विद्यार्थी/ विद्यार्थिनीना विशेष पारितोषिक रु. ५००/- दिले जाते. परंतु या बाबत नमूद करण्यात येते कं, बरेचसे विद्यार्थी / विद्यार्थिनी गुणवत्ता यादीत पहिल्या ५० क्रमांकात आल्याचा अनुक्रमांचे प्रमाणपत्र ( प्रमाणित करुन ) जोडीत नाहीत. तरी या बाबत योग्य ती काळजी घेऊन पहिल्या ५० क्रमांकात उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जा सोबत पाठवावेत.

७) अर्ज पाठविताना कर्मचा-यांचा वेतनगट व जात या विषयाची माहिती अर्जावर लाल शाईने लिहावी. मागासवर्गीय कर्मचा-यांनी अर्जा सोबत जातीचा दाखला आवश्यक जोडावा. कृपया परिपत्रकास जास्तीत जास्त प्रसिध्दी धावी. सदरहू परिपत्रकाची कृपया पोच पावती धावी.

सोबत :- वरील प्रमाणे प्रपत्र.

3ाउमीकान्त सिरोजी

सचिव
कर्मचारी कल्याण निधी समिति व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी करिता.

प्रति;
प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

कदम / १६-६

## प्रपत्र नमुना

**रोख पारितोषिक/विशेष पारितोषिक/शिष्यवृत्ती मिळण्यासाठी/शिष्यवृत्ती चालू ठेवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अर्जाचा नमुना.**

१) अर्जदाराचे नाव (पत्त्याचे नांव) :
२) वडिल/पालकांचे नांव व हुद्दा (कर्मचाऱ्याचे) :
३) भविष्य निर्वाह निधी क्रमांक :
४) वडिल/पालकांचे काम करण्याचे ठिकाण :
संभाग :
प्रविभाग :
परिमंडळ :
५) वेतन गट :
६) अनुसूचित जात/जमात भटकी जमात/इतरमागासवर्गीय जातीत मोडत आहात काय? (असल्यास तत्संबंधीचा दाखला जोडावा.) :

---

### (अ)

रोख बक्षिस योजनेकरिता रु. [illegible], रु. [illegible]/-, रु. १५०/- रु. १२५/-, रु. १००/-, रु. ७०/- मिळण्याकरिता माहिती.

१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा पास झाल्याची तारीख :-

२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षेला बसलेल्या केंद्राचे व शाळेचे नांव :-
केंद्र :-
शाळा :-

३) एकंदर गुण व गुणांची टक्केवारी :-
(प्रथम किंवा दुसरा वर्ग)

सूचना :- गुणपत्र/शाळेचा दाखला साक्षांकित केलेल्या प्रतीसह विद्यार्थ्याचे वडील/पालक काम करीत असलेल्या युनिटच्या प्रभारी अधिकाऱ्याने साक्षांकित करावे.

### (ब)

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या गुणवत्ता यादीत पहिल्या ५० क्रमांकापर्यंत आलेल्या विद्यार्थ्यांना/विद्यार्थिनींना विशेष रोख बक्षिस रु. ५००/- मिळण्यासाठी द्यावयाची माहिती:

१) माध्यमिक शालांत, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा पास झाल्याची तारीख :-

२) परिक्षा मंडळाचे नांव व पहिल्या ५० विद्यार्थ्यांत मिळविलेला गुणवत्ता क्रमांक :-
(परिक्षा मंडळाकडून किंवा मुख्याध्यापक, शाळा यांचेकडून मिळालेला गुणवत्ता नंबर निर्देशित केलेला दाखला जोडावा)

३) एकंदर मिळविलेले गुण व त्याची टक्केवारी :-

सूचना :- माध्यमिक शालांत उच्चमाध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा पास झाल्याचा दाखला व गुणपत्रिका यांची एक प्रत साक्षांकित केलेली व गुणवत्ता क्रमांक सोबत जोडावा.

### (क)

शिष्यवृत्ती मिळण्यासाठी किंवा पुढे चालू करण्याकरिता लिहिलेली माहिती.

१) पुढील शिक्षण/उच्चशिक्षण चालू ठेवण्यासाठी ज्या शाळेत/कॉलेजात प्रवेश घेतला त्याचे नांव :-
(प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडावा.)

२) अ) मागील परिक्षा उत्तीर्ण झाल्याची तारीख व गुण :-
(गुणपत्रिकेची प्रत जोडावी)
ब) एकंदर मिळविलेले गुण व त्याची टक्केवारी :-
क) आता कोणत्या वर्गात शिकत आहात.

३) मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाली आहे का ? :-
(असल्यास परिपत्रक क्र. व तारीख नमूद करावी.)

सूचना :- अ) पास झालेल्या परिक्षेची गुणपत्रिका व दाखला साक्षांकित केलेले जोडावे.
ब) मागील परिक्षा पास झाल्याची गुणपत्रिकेची प्रत साक्षांकित केलेली जोडणे.
क) ज्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला त्या कॉलेजच्या मुख्याध्यापकांकडून घेतलेला दाखला जोडावा.

.... २.

मी श्री/श्रीमती ———————————————— हुद्दा ———————————— कुमार/कुमारी ————————
याचो/याचे वडील/वाई महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ———————————— येथे काम करीत असलेला/लो असे नमूद करितो/ते को वरील दिलेली माहिती सत्य आहे.

कर्मचा-याचो सही

सादर करोंषित :-
जे प्रमाणित करण्यात येते को, माझ्या माहितीनुसार वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

नियंत्रक अधिका-याचो सही
शिक्का